

श्री.जयदिप डाकरे सर   श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe   इयत्ता – पाचवी   (10 जुलै) माझा अभ्यास   Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस दहावा :

CLICK HERE



गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

खालील स्वाध्याय सराव करा.

टेस्ट सोडवा

# २. बंडूची इजार

## स्वाध्याय

**उजळणी करा.**

प्र. १. चर्चा करून उत्तरे लिहा.

(अ) बंडूची इजार लांब झाली म्हणून कापून कमी केली. जर ती आखूड झाली असती, तर ती लांब करण्यासाठी काय करावे लागले असते? शक्य तेवढे सगळे मार्ग सुचवा.

(आ) इजारीची चड्डी झाली, यात चूक कोणाची?

(इ) बंडूच्या इजारीचे पाय चार बोटे कापले, म्हणजे 'पाय' असणारी इजार सजीव आहे, असे आपण म्हणत नाही; पण बोलताना आपण असेच बोलतो. इजारीसारख्या कितीतरी वस्तूंना वेगवेगळ्या अवयवांची नावे वापरतात. त्यांची नावे सांगा.

प्र. २. खालील वाक्यांमध्ये कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा. त्या वाक्यांचा अर्थ लिहा.

(कान, नाक, पाय, हात, डोळा, केस, पाठ, पोट, गळा, तोंड)

(अ) चुलीवरच्या तव्याची ................ काळीभोर झाली होती.

(आ) कपाचा ................ तुटला होता, म्हणून दिलावरने चहा ग्लासात ओतला.

(इ) 'हा नारळ नासका निघणार,' नारळाचा ................ बघून धनव्वा म्हणाली.

(ई) मुसळधार पाऊस पडल्यामुळे नदीचे ................ फुगले होते.

(उ) कितीही जोर लावला तरी बाटलीचे ................ उघडेना.

(ऊ) चरवीतले दूध गंजात ओतले, तर ते गंजाच्या ................ पर्यंत आले.

(ए) सुईच्या ................ दोरा ओवून धोंडूमामांनी शिलाई मशीन सुरू केली.

(ऐ) आंब्याच्या कोईचे ................ पांढरे होईपर्यंत गणू कोय चोखत राहिला.

(ओ) आपले शेकडो ................ पसरून उभे असलेले वडाचे झाड वर्षानुवर्षे सगळ्यांना सावली देते.

(औ) खोलीतल्या एकमेव खुर्चीचा ................ मोडला होता, म्हणून मी जमिनीवर बसलो.

• 'भिंतीलाही कान असतात.' ही म्हण आपण वापरतो. 'भिंतीला' कपांप्रमाणे कान नसतात. भिंतीला 'कान' असतात, हे कोणत्या अर्थाने वापरले आहे, ते शिक्षक, पालक यांच्याशी चर्चा करून सांगा.

वरीलप्रमाणे 'त्याच्या पैशाला पाय फुटले,' असेही बोलताना आपण म्हणतो. यासारखी उदाहरणे शोधा. त्यांचा अर्थ माहीत करून घ्या. बोलण्यात त्यांचा वापर करा.

सूचनेनुसार कृती करा.

## 2. संख्याज्ञान

टेस्ट सोडवा

उदाहरणसंग्रह 5

1. खालील संख्यांतील अधोरेखित अंकांची स्थानिक किंमत लिहा.

   (1) 78, 95,210   (2) 14, 95,210   (3) 3,52,749   (4) 50,000   (5) 89, 99,988

2. खालील संख्या विस्तारित रूपात लिहा.

   (1) 56, 43, 215   (2) 70, 815   (3) 8, 35, 999   (4) 8, 88, 889   (5) 92, 32, 992

3. खालील संख्यांतील प्रत्येक अंकाचे स्थान व त्याची स्थानिक किंमत लिहा.

   (1) 35, 705   (2) 7, 82, 899   (3) 82, 74, 508

4. संख्येचे विस्तारित रूप दिले आहे. त्यावरून संख्या लिहा.

   (1) 60, 000 + 4000 + 600 + 70 + 9   (2) 9, 00, 000 + 20,000 + 7000 + 800 + 5

   (3) 20,00,000 + 3,00,000 + 60,000 + 9000 + 500 + 10 + 7

   (4) 7,00,000 + 80,000 + 4000 + 500   (5) 80,00,000 + 50,000 + 1000 + 600 + 9

**फासा घेऊन खेळण्याचा एक मजेदार खेळ पाहा.**

खालीलप्रमाणे प्रत्येक खेळाडूचे नाव असलेली सारणी करा.
प्रत्येक नावापुढे सात अंकी संख्या बनवण्यासाठी चौकटी आहेत.

| खेळाडूंची नावे | दल | ल | दह | ह | श | द | ए | तयार होणारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अजय | 1 | | | | | | | |
| मेघा | | | | 3 | | | | |
| पुष्कर्णी | 6 | | | | | | | |
| विजय | | 2 | | | | | | |

**खेळ 1 :** पहिल्या खेळाडूने फासा टाकून दान घ्यावे. ते दान स्वत:च्या नावापुढील कुठल्याही चौकटीत भरावे. एका चौकटीत अंक लिहिला, की जागा बदलता येणार नाही. प्रत्येक चौकटीत एकच अंक लिहायचा. मग क्रमाने प्रत्येक खेळाडूने फासा टाकून आपले दान, आपल्या नावापुढच्या कुठल्याही रिकाम्या चौकटीत भरावे. याप्रमाणे हळूहळू सर्व चौकटी भरतील व प्रत्येकाची एक सात अंकी संख्या तयार होईल. ज्याची संख्या सर्वांत मोठी, तो जिंकणार.

**खेळ 2 :** सारणी व त्यातील चौकटी खेळ नं. 1 प्रमाणेच; पण फासा टाकून मिळालेले दान प्रत्येक खेळाडू कुणाच्याही नावापुढील कुठल्याही रिकाम्या चौकटीत लिहू शकेल. ज्याची संख्या सर्वांत मोठी तो जिंकणार.

**खेळ 3 :** खेळण्याचे सगळे नियम खेळ 2 प्रमाणे. सर्वांच्या सात अंकी संख्या तयार झाल्यावर ज्याची संख्या सर्वांत लहान तो जिंकणार.

## 2. Number Work

## Follow the instructions.

### Problem Set 5

**1.** Write the place value of the underlined digit.

(1) 78, 95,210 (2) 14, 95,210 (3) 3,52,749 (4) 50,000 (5) 89, 99,988

**2.** Write the numbers in their expanded form.

(1) 56, 43, 215 (2) 70, 815 (3) 8, 35, 999 (4) 8, 88, 889 (5) 92, 32, 992

**3.** Write the place name and place value of each digit in the following numbers.

(1) 35, 705 (2) 7, 82, 899 (3) 82, 74, 508

**4.** The expanded form of the number is given. Write the number.

(1) 60, 000 + 4000 + 600 + 70 + 9 (2) 9, 00, 000 + 20,000 + 7000 + 800 + 5

(3) 20,00,000 + 3,00,000 + 60,000 + 9000 + 500 + 10 + 7

(4) 7,00,000 + 80,000 + 4000 + 500 (5) 80,00,000 + 50,000 + 1000 + 600 +9

### An interesting dice game

Prepare a table with the name of each player, as shown below.
In front of each name, there are boxes to make seven-digit numbers.

| Names | TL | L | TTH | TH | H | T | U | The number formed |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Ajay | 1 | | | | | | | |
| Megha | | | | 3 | | | | |
| Pushkarni | 6 | | | | | | | |
| Vijay | | 2 | | | | | | |

**Game 1** : The first player throws the dice and writes that number in any one of the boxes in front of his/her name. You can write only one number in each box and once it is written, you cannot change its place. The other players do the same till all the boxes are filled and each one gets a seven-digit number. The one with the largest number is the winner.

**Game 2** : Use the same table, but you may write the number (you get on throwing the dice) in any box in front of anyone's name. The one with the largest number is the winner.

**Game 3** : The rules are the same as for game 2, but the one with the smallest number is the winner.

टेस्ट सोडवा

## look , listen and read aloud.

**3.** Look, listen and read aloud with me. Select any one number and frame a sentence about it. पहा, ऐका आणि माझ्याबरोबर मोठ्याने वाचा. कोणतीही एक संख्या निवडून त्याविषयी एक इंग्रजी वाक्य तयार करा. O1

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| one | eleven | 21 | 31 | 41 | 51 | 61 | 71 | 81 | 91 |
| two | twelve | 22 | 32 | 42 | 52 | 62 | 72 | 82 | 92 |
| three | thirteen | 23 | 33 | 43 | 53 | 63 | 73 | 83 | 93 |
| four | fourteen | 24 | 34 | 44 | 54 | 64 | 74 | 84 | 94 |
| five | fifteen | 25 | 35 | 45 | 55 | 65 | 75 | 85 | 95 |
| six | sixteen | 26 | 36 | 46 | 56 | 66 | 76 | 86 | 96 |
| seven | seventeen | 27 | 37 | 47 | 57 | 67 | 77 | 87 | 97 |
| eight | eighteen | 28 | 38 | 48 | 58 | 68 | 78 | 88 | 98 |
| nine | nineteen | 29 | 39 | 49 | 59 | 69 | 79 | 89 | 99 |
| ten | twenty | thirty | forty | fifty | sixty | seventy | eighty | ninety | hundred |

- They had two daughters.
- January has thirty-one days.
- A spider has eight legs.
- There are seven days in a week.
- There are eighty-eight pages in this book.
- My brother made fifty-four runs yesterday.

**4.** Read aloud and learn. मोठ्याने वाचा आणि शिका. O4

- 100 One hundred
- 1000 One thousand
- 10,000 Ten thousand
- 100,000 A hundred thousand / One lakh
- 1,000,000 A million / Ten lakh
- 10,000,000 Ten million / One crore

**5.** Make a big chart of numbers 1 to 100 written in words. 1 ते 100 संख्या शब्दांत लिहून तक्ता तयार करा. W10

**6.** Think of larger numbers and make suitable sentences. मोठ्या संख्या मनात धरा आणि त्यांना साजेशी इंग्रजी वाक्ये तयार करा. O15

- There are three hundred and sixty-five days in a year.
- My mother bought a table for five thousand rupees.
- There are millions of stars in the sky.

संख्यांच्या आधारे वाक्य तयार करण्याच्या कृती वर्गात प्रथम तोंडी करून घ्याव्या. मुलांनी सांगितलेली वाक्ये (आवश्यक त्या सुधारणा करून) शिक्षकांनी फळ्यावर लिहावी व एकत्र प्रकट वाचून घ्यावी.

पाठ वाचा व समजून घ्या.

## २. पृथ्वीचे फिरणे

टेस्ट सोडवा

### लीप वर्ष

ग्रेगरियन पद्धतीच्या दिनदर्शिकेत वर्षाचे सर्वसाधारणपणे ३६५ दिवस धरतात. याचा अर्थ असा, की प्रत्येक वर्षात सहा तास कमी धरले जातात, म्हणजेच चार वर्षांत २४ तास किंवा १ पूर्ण दिवस कमी धरला जातो. हा दिवस भरून काढण्यासाठी ग्रेगरियन दिनदर्शिकेतील प्रत्येक चौथ्या वर्षात फेब्रुवारी महिन्यात एक अधिकचा दिवस जोडला जातो. त्यावर्षी फेब्रुवारी महिना २८ ऐवजी २९ दिवसांचा असतो आणि ते वर्ष ३६५ ऐवजी ३६६ दिवसांचे असते. या वर्षाला लीप वर्ष म्हणतात.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

पृथ्वीवर दिन व रात्रीचा कालावधी सारखा नसतो, हे आपण मागील इयत्तेत पाहिले आहे. पृथ्वीचा आस कललेला असल्यामुळे व पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे हा फरक होतो.

२२ मार्च ते २३ सप्टेंबर या काळात उत्तर गोलार्धात दिनमान जास्त असते. म्हणजे दिन मोठा असतो. त्यामुळे तेथे उष्णता जास्त असते, म्हणून या काळात उत्तर गोलार्धात उन्हाळा असतो. याच काळात दक्षिण गोलार्धात मात्र रात्रमान जास्त असते. म्हणजेच रात्र मोठी असते. त्यामुळे या भागात उष्णता कमी प्रमाणात मिळते. त्यामुळे दक्षिण गोलार्धात हिवाळा असतो.

२३ सप्टेंबर ते २२ मार्च या काळात दक्षिण गोलार्धात दिनमान जास्त असते. त्यामुळे तेथे उष्णता जास्त मिळते. म्हणून या काळात दक्षिण गोलार्धात उन्हाळा असतो. याच काळात उत्तर गोलार्धात मात्र रात्रमान जास्त असते. त्यामुळे या भागात उष्णता कमी प्रमाणात मिळते. परिणामी उत्तर गोलार्धात हिवाळा असतो.

वरील तारखांमध्ये लीप वर्षामुळे फरक पडू शकतो. याची नोंद घ्या. भारतात प्रामुख्याने उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे मुख्य ऋतु मानतात. तसे आपण वर्षभरात वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर, असेही ऋतू मानतो. असे सहा ऋतुंचेही चक्र असते. आपल्या देशात ऋतुमानाशी निगडीत सण व उत्सव साजरे केले जातात. तसेच विविध गाणी म्हटली जातात आणि खेळही खेळले जातात.

### चंद्राच्या कला

**सांगा पाहू !**

(१) आपल्याला दिसणाऱ्या चंद्राच्या प्रकाशित भागांना काय म्हणतात?

(२) पौर्णिमेला चंद्र कसा दिसतो? अमावस्येला चंद्र कसा दिसतो?

### पौर्णिमा आणि अमावास्या

चंद्र पृथ्वीभोवती परिभ्रमण करतो आणि पृथ्वी सूर्याभोवती परिभ्रमण करते; परंतु या दोन भ्रमणकक्षा एकमेकांना छेदतात, म्हणून सूर्य, चंद्र आणि पृथ्वी हे एकाच सरळ रेषेत नेहमीच असतात असे नाही.

आपल्याला चंद्राच्या पृष्ठभागाचा पृथ्वीकडील अर्धा भाग दिसतो, म्हणजे पृथ्वीवरून आपल्याला चंद्राची नेहमी एकच बाजू दिसते.

चंद्र स्वयंप्रकाशित नाही. सूर्याचा प्रकाश चंद्रावर पडल्यामुळे तो आपल्याला पृथ्वीवरून दिसतो. पौर्णिमेच्या रात्री आपल्याला चंद्राचा पृथ्वीकडील पूर्ण भाग दिसतो. अमावास्येच्या रात्री चंद्राचा कुठलाच भाग दिसत नाही.

पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंत चंद्राचा पृथ्वीवरून दिसणारा प्रकाशित भाग कमी कमी होत जातो. अमावास्येपासून पौर्णिमेपर्यंत तो पुन्हा वाढत वाढत जातो. यालाच आपण 'चंद्राच्या कला' म्हणतो.

### चांद्रमास आणि तिथी


अमावास्येपासून पौर्णिमेपर्यंतच्या पंधरा दिवसांच्या कला तुम्ही पाहिल्या आहेत. अमावास्येपासून पौर्णिमेच्या स्थितीत येण्यास चंद्राला १४ किंवा १५ दिवस लागतात. या पंधरवड्याला 'शुक्लपक्ष' म्हणतात.

पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा.

## १. इतिहास म्हणजे काय ?

टेस्ट सोडवा

४. संकल्पनाचित्र तयार करा. **सराव करा.**




५. पुढील तक्त्यात इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण करा.

इतिहासाची साधने – नाणी, पत्रव्यवहार, किल्ले, जात्यावरील ओव्या, भांडी, ताम्रपट, वाडे, शिलालेख, लोकगीते, स्तंभ, चरित्रग्रंथ, लेणी, लोककथा.

| भौतिक | लिखित | मौखिक |
|---|---|---|
| | | |

### उपक्रम

(अ) तुमच्या गावातील / परिसरातील ऐतिहासिक वास्तूंची आणि प्राचीन धार्मिक स्थळांची माहिती व चित्रे संकलित करा.

(आ) तुमच्या शाळेचा इतिहास जाणून घेण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या साधनांचा वापर कराल, याची यादी तयार करा व साधनांवरून तुम्हांस कोणती माहिती मिळू शकेल ते लिहा.

जसे – शाळेची कोनशिला :- शाळेची स्थापना, उद्घाटक इत्यादी.

### हे तुम्हांला माहीत आहे का ?

#### पुरातत्त्व

विविध मानवी समाजांनी भूतकाळात निर्माण केलेल्या अनेक वस्तू आणि वास्तू यांचे अवशेष ठिकठिकाणी पहायला मिळतात. त्यांतील सर्वच जमिनीवर असतात असे नाही. वर्षानुवर्षे पुराने वाहून आणलेल्या गाळाचे किंवा वाऱ्याने वाहून आणलेल्या मातीचे थर साचून त्याखाली काही अवशेष गाडले जातात. मानवाने घडवलेल्या वस्तू आणि वास्तू यांच्याप्रमाणेच मानव आणि प्राणी यांच्या सांगाड्यांचे अवशेषही अशाच पद्धतीने गाडले गेलेले असतात. अशा अवशेषांना पुरावशेष म्हणतात. 'पुरा' म्हणजे जुने.

भूतकाळातील वस्तू आणि वास्तू यांच्या तसेच त्यांच्या अवशेषांच्या आधारे, घडून गेलेल्या घटनांची मांडणी शास्त्रीय पद्धतीने करणाऱ्या शास्त्रास 'पुरातत्त्व शास्त्र' असे म्हणतात. पुरावशेष शोधून काढण्याचे आणि त्यांचा अभ्यास करण्याचे काम पुरातत्त्वज्ञ करतात. जमिनीखाली गाडले गेलेले पुरावशेष उजेडात आणण्यासाठी जमिनीचा एकेक थर अत्यंत शास्त्रशुद्ध रीतीने तपासत, काळजीपूर्वक रीतीने खणण्याला 'पुरातत्त्वीय उत्खनन' असे म्हणतात. पुरावशेष जिथे सापडू शकतील, अशा स्थळांचा शोध प्रथम घेतला जातो. त्यांची व्यवस्थित नोंद केली जाते. त्यानंतर कोणत्या स्थळी उत्खनन करायचे याचे नियोजन केले जाते.

उत्खननात सापडलेल्या अवशेषांचा अभ्यास करत असताना पुरातत्त्वज्ञ अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ,

१. मिळालेले अवशेष कोणत्या काळातील आहेत?
२. ते अवशेष कोणत्या संस्कृतीचे आहेत?
३. त्या संस्कृतीमधील लोकांचे दैनंदिन जीवन कशा प्रकारचे होते?
४. त्या लोकांचे इतर संस्कृतींमधील लोकांशी कशा प्रकारचे संबंध होते?
५. त्या लोकांच्या दैनंदिन जीवनातील गरजा भागवण्यासाठी ते भोवतालच्या परिसरातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग कसा करून घेत होते?

● **सुनो और दोहराओ :**



## ३. योग्य चुनाव



राजा मंगलसेन के मंत्री जगतराम बूढ़े हो चुके थे । उन्होंने राजा से स्वयं को सेवामुक्त करने की विनती की । राजा मंगलसेन ने कहा, ''आप पहले अपने जैसे सेवाभावी, परोपकारी और ईमानदार मंत्री का चुनाव कर लीजिए, तभी आपको सेवामुक्त किया जा सकता है ।'' जगतराम ने आदेश दिया, ''राज्य में ढिंढोरा पिटवा दो कि राज्य के नए मंत्री का चयन अगले गुरुवार को किया जाएगा । इस पद के इच्छुक ग्यारह बजे राजदरबार में पहुँचें ।'' हरकारे गाँव-गाँव ढिंढोरा पीटने लगे ।

चयनवाले दिन राजदरबार की ओर जाने वाले मार्ग पर सुबह से ही नवयुवकों की भीड़ लग गई थी । सैकड़ों की संख्या में युवक दरबार की ओर जा रहे थे । इसी रास्ते पर एक तरफ एक वृद्ध हताश-सा बैठा था । उसकी बैलगाड़ी का एक पहिया रास्ते के किनारे कीचड़ में फँस गया था । वृद्ध ने कई बार पहिया कीचड़ से निकालने की कोशिश की पर असफल रहा । मंत्री पद के अनेक उम्मीदवारों ने राजदरबार जाते समय यह दृश्य देखा पर किसी ने भी वृद्ध की सहायता नहीं की ।



## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| पाचवी मराठी | पाचवी गणित | सेमी गणित | पाचवी इंग्रजी | पाचवी प.अ-1 | पाचवी प.अ-2 | हिंदी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे वेब स्त्रोत-'ई-बालभारती' सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in